28-10-2023

सिटी न्यूज सुपरफास्ट

# शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सुरक्षा कार्यशाळा संपन्न



**अकोट :** शिवाजी कनिष्ट महाविद्यालय येथे नुकतीच सायबर सूरक्षे बाबत कार्यशाळा कार्यक्रम संपन्न झाली यावेळी अकोला शंकरलाल खंडेलवाल महावीद्यालयाचे प्राचार्य डॉ.जगदीश साबू, आणी भौतिकशास्त्र विभागाचे हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली शितल साखरे, नेहा टेरे, सुमित सपकाळ व अनिकेत भुडके या विध्यार्थ्यांनी सायबर शुरक्षा बाबत, ऑनलाईन फसवणूक, वाढता सोशियल मिडीयाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक, आपण करीत असलेली ऑनलाईन खरेदी या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक वालसिंगे होते हा कार्यक्रम क्विक हिल फाऊनडेशन पुणे आणी महाराष्ट सायबर सेल मुंबई यांच्या सहयोगाने संपन्न झाली यावेळी शिक्षक कढू, गावंडे, चौधरी, हिंगनकर व विद्यार्थी उपस्थीत होते.